Application form for obtaining information under
The Right To Information Act, 2005.

To,

जन माहिती अधिकारी ,

मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय,

Full Name of the applicant. नितीन रमेश दळवी

1. Address: १३२/बी , २/९, दामोदर हरिदास बि , टी एच कटारिया मार्ग, माहीम, मुंबई-४०००१६. फोन ९९८७४२२३५९

2. Particulars of information required:-

(i) Subject matter of Information :* RTI Act, 2005 च्या अंतर्गत माहिती मिळवण्यासाठी.

(ii) The period to which the information relates:#

(iii) Description of the information required:$

संदर्भ :- मी मा.मंत्री शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय यांच्या कडे २३/०९/२०२२ रोजी दाखल केलेला माझा दि १५/०९/२०२२ चा तक्रार अर्ज विषय- "जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री देविदास महाजन यांना भ्रष्टाचारा प्रकरणी बडतर्फ करण्याचे व आर्थिक गुन्हे शाखे कडे हे प्रकरण पाठविण्याचे विधान परिषदेत २०२१ च्या तिसऱ्या हिवाळी अधिवेशनात दि २८/१२/२०२१ मा. शिक्षण राज्य मंत्री श्री बच्चू कडू यांनी दिलेले आश्वासन क्र ३१ ची परिपूर्ती आजतायागत न झाल्या मुळे या भ्रष्टाचारा प्रकरणी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याबाबत" (attached pages 3)

मा. महोदय,

१) i ) संदर्भातील नमूद पत्रानुसार आपल्या कार्यालयाकडून प्रचलित नियमांना धरून केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती लेखी स्वरूपात देणे.

ii) ज्या नियमांना धरून सदर कारवाई करण्यात आली त्या नियमांची प्रत देण्यात यावी.

२) संदर्भातील पात्रात नमूद केल्या प्रमाणे सदर कारवाई करण्यासाठी नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव व त्याच्या हुद्द्याची माहिती देणे.

३) सदर पत्रावर कारवाई करण्यासाठी , आजतायागत सर्व अधिकाऱ्यांच्या केलेल्या file noting ची प्रत व त्या त्या अधिकाऱ्यांचे नवे व हुद्दा ह्यांची माहिती देणे .

४) जर संदर्भातील पात्रात नमूद केल्या प्रमाणे कार्यवाही झाली नसल्यास ज्या कारणांमुळे संदर्भातील नमूद पत्रावर कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात अली आहे , त्या नोंद करण्यात आलेल्या कारणांची माहिती लिखित स्वरूपात देण्यात यावी.

५)संदर्भातील नमूद पत्रावर कार्यवाही प्रलंबित ठेवण्यासाठी नोंद केलेल्या कारणांवर जी उपाययोजना करण्यात आली आहे त्याची सविस्तर माहिती देण्यात यावी

(v) In case by post (Ordinary, Registered or Speed). post

Whether the applicant is below poverty line. NO

(if yes, attach the photo copy of the proof thereof)

Place: MUMBAI

Date:१७/०९/२०२२

Signature of Applicant

माहितीचा अधिकार

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
Email ID- adm3.sesd-mh@gov.in

---

क्रमांक : माअअ-२०२२/प्र.क्र.२४९/प्रशा-३ दिनांक : २१ नोव्हेंबर, २०२२

प्रति,

श्री. नितीन रमेश दळवी,
१३२/बी, २/९, दामोदर हरिदास बि,
टी एच कटारिया मार्ग, माहीम, मुंबई-४०० ०१६.

**विषय** :- माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबत.
**संदर्भ** :- आपला दि.१७/०९/२०२२ चा माहिती अधिकार अर्ज

महोदय,

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत आपला दि.१७/०९/२०२२ चा माहिती अधिकार अर्ज संदर्भिय पत्रान्वये या कार्यासनास दि.२१/१०/२०२२ रोजी प्राप्त झाला आहे.

आपल्या संदर्भिय अर्जातील मुद्दा क्र .१ ते ५ च्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विधानपरिषद आश्वासन क्र.३१ प्रकरणी आयुक्त (शिक्षण), पुणे यांना शासनपत्र दि.०९/०२/२०२२ च्या पत्रान्वये आवश्यक तपासणी करुन परिपूर्ण अहवाल शासनास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तथापि, सदर अहवाल अप्राप्त असल्याने दि.१८/०४/२०२२, दि.१७/०५/२०२२, दि.०८/०६/२०२२, दि.२३/०६/२०२२, दि.२२/०७/२०२२, दि.३१/१०/२०२२ व दि.१६/११/२०२२ च्या पत्रान्वये (प्रत संलग्न) वारवांर स्मरण करुन देण्यात आले आहे. तथापि, प्रस्तूत प्रकरणाचा अहवाल अद्यापि अप्राप्त आहे. सदर आश्वासनासंदर्भातील परिपूर्ण अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई करणे शक्य होणार आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदीनुसार सदर माहिती कळविण्यात येत आहे. या प्रकरणी आपणास अपिल करावयाचे असल्यास प्रस्तुत पत्र आपणास प्राप्त झाल्यापासून ३० दिवसांच्या आत प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव /प्रशासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे अपिल करता येईल.

(किसनराव पलांडे)
जन माहिती अधिकारी
तथा अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

सहपत्रः वरीलप्रमाणे

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४१५,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

गोपनिय /स्मरणपत्र क्र.७
विधानमंडळ काजकाज/कालमर्यादा

ई-मेलः-adm३.sesd-mh@gov.in

---

क्रमांक : विपआ-२०२२/प्र.क्र.२३/प्रशा-३

दिनांक : १६ नोव्हेंबर, २०२२

प्रति,

आयुक्त (शिक्षण),
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषयः सन २०२१ च्या हिवाळी अधिवेशनातील विधानपरिषद आश्वासन क्र. ३१ जळगाव जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी मोठ्या प्रमाणावर केलेल्या भ्रष्टाचारबाबत....

संदर्भः-१. शासनाचे समक्रमांकाचे दि.९ फेब्रुवारी, २०२२ चे पत्र व दि.१८/०४/२०२२, दि.१७/०५/२०२२, दि.०८/०६/२०२२, दि.२३/०६/२०२२, दि.२२.०७.२०२२ व दि.३१.१०.२०२२ ची स्मरणपत्रे.
२.आपले क्र. आस्था अ-१०३/नाविना/बच्छाव/६४३४, दि.०३/११/२०२२ चे पत्र.

उपरोक्त विषयांकित प्रकरणी आपल्या संदर्भिय क्र. २ येथील पत्रान्वये शिक्षणाधिकारी (माध्य.), जि. प. जळगाव येथील सन २०१५ ते २०१९ या कालावधीतील वैयक्तिक मान्यता प्रकरणातील दोषींविरुद्ध तत्कालीन मा. राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांनी दिलेल्या आश्वासन क्र.३१ ला अनुसरुन माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दि.११/०५/२०२२ च्या तीन पत्रांन्वये आपणास सादर केलेल्या अहवालासोबत पुरावापत्रे सादर केली नसल्याने पुरावापत्रे प्राप्त करुन घेण्याकरीता शिक्षण उपसंचालक, नाशिक यांच्याशी संपर्क साधला असून याप्रकरणी अनियमित वैयक्तिक मान्यताप्रकरणी शासन परिपत्रक दि.२३/०८/२०१७ (आपल्या पत्रात नमूद दि.२३/०८/२०२२) अन्वये सुनावणी घेवून अनियमित वैयक्तिक मान्यता रद्द झाल्यानंतर, त्यानुषंगाने पडलेल्या आर्थिक भारासह व आवश्यक पुरावापत्रासह परिपुर्ण शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव सादर करण्याबाबत आपल्या स्तरावरुन विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक यांना सूचना दिल्याचे निदर्शनास येते.

सदर विधानमंडळ आश्वासनाची पुर्तता ९० दिवसांत पुर्ण करणे बंधनकारक आहे. तथापि १० महिन्यांपेक्षा अधिक कालावधी होवूनही प्रस्तुत प्रकरणाचा परिपुर्ण अहवाल शासनास अद्यापी प्राप्त झालेला नाही. तरी या बाबीची नोंद घेऊन याप्रकरणी आवश्यक कार्यवाही तातडीने पुर्ण करुन त्याबाबतचा परिपुर्ण अहवाल शासनास दि.२१.११.२०२२ पूर्वी न चुकता सादर करावा.

निर्गमित
दिनांक 16/11/2022
लिपिकाची स्वाक्षरी

(किसनराव पलांडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन